MHKO100006502022

## आदेश निशाणी क्र. ८९

वादी क्र. ३क यांचे वारस यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत वादी क्र. ३क रमेश शिवाप्पा कल्लोळी हे दिनांक २६/०६/२०२५ रोजी मयत झाले असलेने त्यांचे वारस म्हणून रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर दिलेले म्हणणे वाचले. त्याचे असे म्हणणे आहे की, सदर कामातील नियोजीत वादी यांचे वारस यांचा दावा मिळकतीमध्ये हक्क निर्माण होत नाहीत व मिळकतीबाबत दावा चालविणेचा अधिकार प्राप्त होत नाही. या कारणाने अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. वादी यांनी सदरचा दावा गैरहक्काने मालकी हक्क जाहीर होवून मिळणेकरीता व कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केला आहे. सदरचा अर्ज आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. वादी क्र. ३क तर्फे वारस यांचे असे कथन आहे की, वादी क्र. ३क हे दिनांक २६/०६/२०२५ रोजी मयत झाले आहेत म्हणजेच वादी क्र. ३क यांच्या मृत्यूनंतर ९० दिवसात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे व तो मुदतीत आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे

२ वादी यांनी दाव्यात १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करुन पुढील पुर्तता सत्वर करावी.

३ अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ करणेत येत आहे.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.07.23 15:55:49 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २३/०७/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज